पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८, लेखा विभाग
क्रमांक/लेखा/१९/कावि/१७५ /२०१४
दिनांक : २६ /११/२०१४

**परिपत्रक**

**विषय :- Supply बिलामधील VAT वजातीबाबत...**

पिंपरी चिचवड महानगरपालिकेला पुरवठा केलेल्या वेगवेगळ्या साहित्यांची बिले विविध विभागामार्फत लेखा विभागाकडून अदा करणेत येत आहेत. सदरची बिल अदा करताना बिलामध्ये VAT ची रक्कम दाखविण्यात येते व प्रत्यक्षात सदरची रक्कम संबंधित विभागाकडे भरणा होत नसल्याचे VAT विभागाचे निदर्शनास आलेले आहे, त्यामुळे VAT बिलांचे तिमाही डेटा VAT विभागाला सादर करणे बंधनकारक करणेत आलेले आहे, त्यासाठी लेखा विभागाचे संगणक प्रणाली योग्य ते बदल करणेत आलेले आहेत ते खालीलप्रमाणे

- Supply बिल नेहमीप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये नोंदविताना सर्व माहिती भरुन झाल्यानंतर VAT amount मध्ये बिलांमध्ये दर्शविलेली एकूण VAT ची रक्कम टाकण्यात यावी.
- त्यानंतर VAT Details वर क्लिक करावे.
- Item Name मध्ये थोडक्यात पुरवठा केलेल्या मालाचे वर्णन टाकावे उदा.फर्निचर, स्टेशनरी, छपाई
- Bill Amount मध्ये एकुण बिलाची रक्कम टाकण्यात यावी.
- Tin No मध्ये नंबर नसल्यास संबंधित ठेकेदाराचा VAT नंबर टाकण्यात यावा, व त्याचा शेवटचा डिजीट हा V ने समाप्त होणारा असावा उदा.**27610308121V**
- VAT amount मध्ये Vat ची एकूण रक्कम टाकण्यात यावी
- एकापेक्षा जास्त बिले असेल तर Add more मधून आणखी माहिती भरता येऊ शकेल.
- सर्व माहिती उदा.एकूण VAT ची रक्कम व VAT Details मधील VAT ची रक्कम बरोबर होणार नाही तोपर्यंत बिल सेव्ह होणार नाही.

तरी यापुढे ज्या पुरवठा धारकाने बिलामध्ये VAT ची रक्कम दाखविलेली आहे अशा सर्व बिलांची व्हॅटची रक्कमेचा तपशिल संगणक प्रणालीमध्ये नोंदविणेत यावेत, जेणेकरून सदरची माहिती संबंधित विभागाला तिमाही स्वरूपात देणे सोईचे होईल. ज्या बिलांची VAT चा तपशिल नोंदविलेला नाही अशी लेखा विभागामध्ये बिले स्विकारणेत येणार नाहीत. संगणक प्रणालीमध्ये काही अडचणी असल्यास मे.प्रॉबिटी सॉफ्ट अथवा लेखा विभागाशी संपर्क साधण्यात यावा.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रत :- सर्व संबंधित विभाग